# प्रकरण पहिले

## शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचा पूर्वेतिहास

## प्रकरण पहिले

## १:१ शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचा पूर्वेतिहास

### प्रस्तावना:

मनुष्यप्राण्यामध्ये व मानवेतर प्राण्यामध्ये सहकार आढळतो (उदा. मधमाशा, पक्षांचा थवा, गुरांचा कळप इ.) सहकार हे तत्त्व मानवी समाजाइतकेच पुरातन आहे. सहकार वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. भारतीय संस्कृतीतील विकास प्रक्रियेतील एक प्रभावी साधन म्हणजे सहकार.

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदल झाले. मोठे उद्योग, मोठी यंत्रसामुग्री, श्रमविभागणी व मोठ्या प्रमाणात उत्पादन यातून समाजात परस्पर विरोधी हितसंबंध असणारे भांडवलदार व श्रमिक असे दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदारांच्या हाती सत्ता व संपत्ती केंद्रीत झाल्याने समाजात अनीती, अप्रामाणिकपणा, नफेबाजी, भ्रष्टाचार, सामान्यांची पिळवणूक यांसारख्या अपप्रवृत्तींना ऊत आला. यातून समाजात वर्गसंघर्ष वाढत होता. औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेला वर्गकलह, अन्याय व विषमता यातून सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला. सन १८४४ मध्ये इंग्लंड येथे रॉशडेल खेड्यातील टोड्लेन गल्लीतील अठ्ठावीस विणकरांनी जीवनावश्यक वस्तू, रास्त किंमतीला उपलब्ध व्हाव्यात म्हणून ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली. त्या संस्थेचे नाव "रॉशडेल इक्वीटेबल पायोनिअर सोसायटी" असे होते.

मनुष्याच्या विकासातील उत्क्रांत प्रवाह म्हणजे सहकार. सहकाराची जोड असल्याशिवाय सांस्कृतिक व आर्थिक भरभराट होऊ शकत नाही.

## १:२ सहकाराचा अर्थ:

सहकार या संकल्पनेबाबत विचारवंतामध्ये एकमत आढळत नाही. विविध विचारप्रणाली धारण करणाऱ्या राष्ट्रांतर्गत अर्थरचनेच्या व राजनीतीच्या चौकटीत बसणाऱ्या सहकाराच्या विविधांगी व्याख्या दिल्या आहेत. त्यामुळे आपापल्या दृष्टीकोनातून दिल्या गेलेल्या व्याख्येत मतभिन्नता आढळते. तथापि पुढील दोन संकल्पनाद्वारे सहकाराचा अर्थ सुचित करता येतो.

अ) सहकार:

प्रत्येकाने स्वत:पुरते व स्वतंत्रपणे कार्य न करता अनेकांनी एकत्र व परस्परांच्या सहाय्याने कार्य करणे हा सहकार शब्दाचा अर्थ आहे. दुसऱ्या बरोबर स्वखुशीने काम करणे त्याला सहकार म्हणतात.

ब) सहकार्य:

सहकार्य म्हणजे स्वत:ची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या हेतूने समतेच्या पायावर खुशीने व मानवतेने एकत्रित मिळून इच्छिलेले काम करण्यासाठी केलेली संघटना त्यास सहकार्य असे म्हणतात.[१]

## १:३ सहकाराच्या काही व्याख्या:

सहकार या संकल्पनेचा व्यावहारिक अर्थ, सहकाराचे मानवी जीवनातील महत्त्व आणि आधुनिक सहकारी चळवळीची पार्श्वभूमी इत्यादी गोष्टींचा परामर्श घेतल्यावर सहकाराची व्याख्या करण्याचा प्रश्न निर्माण होतो. सहकाराची एकच सार्थक व सर्वांना मान्य होणारी व्याख्या देता येत नाही. कारण वेगवेगळ्या कालखंडात परिस्थितीजन्य निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने वेगवेगळी विचारप्रणाली धारण करणाऱ्या

राष्ट्रात सहकारी चळवळ सुरु झाल्याने सहकाराच्या व्याख्यात विभिन्नता आढळते. तथापि आर्थिक विकासाचे व सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी साधन या नात्याने पुढील व्याख्यांच्या सहाय्याने सहकारी चळवळीचे स्वरुप समजू शकते.

१) सी.आर.के.:

"निस्वार्थी वृत्तीने व्यापार किंवा व्यवहार करण्यासाठी दुर्बलतेतून अस्तित्वात आलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. तसेच सभासदांनी सहकारी संस्थेमार्फत केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात संस्थेच्या नफ्यात भागीदार होता येईल या अटीवर संस्थेचा कारभार चालविण्यात येतो."

२) एम्. डार्लिंग:

"अर्थव्यवस्था" किंवा "अर्थपध्दती" यापेक्षा काहीतरी अधिक अर्थ सांगणारी संकल्पना म्हणजे सहकार होय. ह्दय व मन यांना आवाहन करणारी ही संकल्पना आहे. व्यवसायातील धर्म म्हणजे सहकार. तसेच स्वावलंबन व सेवा यांचे शिक्षण देणारी सहकारी चळवळ असते.

३) सर होरेस प्लंकेट:

"व्यक्तींच्या संघटनेतून परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकारी चळवळ होय. सहकाराची तीन उद्दिष्टे आहेत - उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान."

४) एच्. कलव्हर्ट:

"व्यक्तींनी स्वेच्छेने एकत्रित येऊन स्वत:च्या व सर्वांच्या आर्थिक हितरक्षणासाठी व वृध्दीसाठी समतेच्या पायावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय."

५) व्ही. एल्. मेहता:

"समान गरजा असलेल्या आणि समान आर्थिक उद्दिष्टये साध्य करण्याकरिता एकत्रित आलेल्या व्यक्तींच्या ऐच्छिक संघटनेची वाढ करणारी सहकार ही विस्तृत अशी चळवळ आहे."

६) भारतीय सहकारी कायदा:

"सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय."[२]

७) महाराष्ट्र सहकार कायदा (१९६०):

सहकार कायद्यातील आधुनिक विचार प्रवाहाचा अभ्यास करुन खालील उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी सहकार कायद्यात पूरक तरतुदी करण्यात आल्या

अ) सहकारी संस्था लोकशाही तत्त्वावर चालणारी असल्यामुळे सर्व प्रकारच्या व्यक्तींना कोणताही भेदभाव न करता खुले सभासदत्व असणे आवश्यक आहे.

ब) सहकारी संस्था दुर्बलांच्या हितासाठी लोकशाही पध्दतीने चालावयाची असेल तर काही विशिष्ट हितसंबंधी व्यक्तींचे अथवा यांचे वर्चस्व संस्थेच्या कारभारामध्ये असून चालणार नाही.

क) सहकारी संस्थेच्या कारभारातील सहकारी चळवळीतील सरकारचा व अधिका-यांचा फाजील आणि अवास्तव हस्तक्षेप दूर होऊन सहकारी चळवळ हा-या अर्थाने स्वायत्त, स्वयंशासित व स्वयंचलीत ठेवणे.

ड) सहकारी चळवळीमधील प्रस्थापित हितसंबंधीयांचे वर्चस्व दूर करून सहकारी चळवळ ह-या अर्थाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या उन्नतिचे साधन म्हणून राबविणे. तसेच सहकारी सदस्यांना लोकशाहीच्या शिक्षणातून स्वत:च्या व्यक्तीमत्त्वाचा आविष्कार घडवून आणण्याची संधी उपलब्ध करून देणे.[3]

१:४ सहकारीची विशेष लक्षणे (वैशिष्टये):

अनेक विद्वान, तत्त्वचिंतक, तज्ज्ञांच्या समित्यांनी, सहकाराच्या व्याख्या दिल्या आहेत. परंतु या व्याख्यांपैकी कोणतीही व्याख्या परिपूर्ण नाही. सहकारी संघटनेची व्यवच्छेदक लक्षणे जी या विविध व्याख्यांतून प्रकर्षाने उठून दिसतात त्यांची सारांशाने पुढील प्रमाणे मांडणी करता येईल —

१) सहकार हे व्यक्तींचे संघटन आहे. येथे भांडवलापेक्षाही व्यक्तीला अधिक महत्त्व देण्यात आले आहे.

२) सहकार एक आर्थिक व्यवहार (उद्योग) आहे. कल्याणकारी किंवा धर्मादाय व्यवहार नव्हे. सभासदांनी स्वत:च्या खर्चाने, भांडवलाने व जोखामीवर चालविलेला व्यवहार आहे.

३) सहकारात ऐच्छिक संघटन अभिप्रेत आहे. सक्तीला येथे स्थान नाही. पण विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात त्याच्याही मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत. (उदा. सहकारी शेती अथवा पाणी पुरवठयाच्या योजनेमध्ये समाविष्ठ होण्यास तयार नसलेला एखादा मध्यवर्ती जमिनी-च्या तुकडयाचा शेतकरी सक्तीने समावेश केला जाऊ शकतो.)

४) सहकार हे लोकशाही संघटन आहे. भांडवलप्रधान लोकशाहीपेक्षा मानवप्रधान लोकशाहीवर अधिक भर आहे. म्हणूनच सहकारी लोक-शाहीमध्ये दरडोई एकमत (एक व्यक्ती एक मत) असे तत्त्व आहे.

आहे. यामुळे वैयक्तिक सामूहिक समताही साधली जाते. धर्म, पंथ, जात, यांनाही स्थान नाही. धर्म-राजकारण-निरपेक्ष संघटन हवे.

५) लाभेक दृष्टीपेक्षा सेवाभावावर भिस्त - दुर्बलांची ही संस्था असल्याने स्वस्त सेवा अभिप्रेत आहे. (स्वस्त कर्ज, वस्तू, सेवा इ.इ.) अर्थात लाभाला येथे गौण स्थान आहे. खर्चात बचत साधण्याचे उद्दिष्ट असते.

६) सभासदांना संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात आधिक्यात सहभाग मिळतो. संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने जसे हे आवश्यक आहे तसे सभासदांची निष्ठा, व्यवहारातील हिस्सा वाढविण्याच्या दृष्टीनेही हे जरूर आहे.

७) सहकारी चळवळ ही सामाजिक व आर्थिक चळवळ आहे. शांततेच्या मार्गाने सामाजिक व आर्थिक रचनेत क्रांतिकारक बदल घडवून आणणे हा तिचा उद्देश असतो.[४]

थोडक्यात, आपल्या दुर्बलतेवर मात करून वैयक्तिक व्यावहारिक विकास घडवून आणण्यासाठी स्वेच्छेने व्यक्ती एकत्रित येऊन संघटना उभारतात. लोकशाही आणि समानतेच्या तत्त्वावर ती चालवितात. सामाजिक उत्तरदायित्वाचा विसर पडू न देता ते लाभ मिळवितात किंवा बचत साधतात. सबळांना उपलब्ध असलेले लाभ, सोयी स्वत:च्या कक्षेत आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांची शक्ती व संख्या जसजशी वाढेल तसतसे शांततामय सामाजिक परिवर्तन, समतेच्या अंगाने वेगाने होत जाईल. हेच सहकाराचे यश मानता येईल. याप्रमाणे आर्थिक, सामाजिक, नैतिक, राजकीय विधायक हेतू सहकारी मार्गाने साध्य करता येतात.


१:५ भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे वर्गीकरण:

भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे वर्गीकरण मुख्यत: दोन विभागात करण्यात येते:

अ) कृषी सहकारी पतपुरवठा संस्था व

ब) बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था.

भारतातील कृषी व बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करणेत येते:


भारतातील सहकारी पतपुरवठा संस्था
कृषी सहकारी पतपुरवठा
बिगर कृषी सहकारी पतपुरवठा
त्रिस्तरीय रचना (अल्प आणि मध्यम मुदतीचा सहकारी पतपुरवठा)
राज्य सहकारी बँका
प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था
द्विस्तरीय रचना (दीर्घ मुदतीचा सहकारी पतपुरवठा)
राज्य सहकारी भूतारण बँका
प्राथमिक सहकारी भूतारण बँका
राज्य सहकारी बँका
मध्यवर्ती सहकारी बँका
प्राथमिक बिगर शेती पतपुरवठा सहकारी संस्था
पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी पतसंस्था
नाकरी सहकारी बँका
राज्य औद्योगिक सहकारी बँका
मध्यवर्ती औद्योगिक सहकारी बँका
.........

भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे स्वरुप पिरॅमिडसारखे आहे. राज्य सहकारी बँक ही सर्व सहकारी संस्थांची शिखर बँक आहे. राज्य सहकारी बँका मध्यवर्ती बँकेस सलग आहेत. भारतात प्रत्येक राज्यात एक राज्य सहकारी बँक आहे. आणि ही बँक जिल्हा स्तरावरील मध्यवर्ती सहकारी बँकेस अर्थ पुरवठा करते, तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका प्राथमिक सहकारी पतपुरवठा सहकारी संस्थांना मदत करतात. तसेच नागरी सहकारी बँका व पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था आणि राज्य औद्योगिक व मध्यवर्ती औद्योगिक सहकारी बँका बिगर कृषि सहकारी पतपुरवठा करतात.

१:५ ब: <u>पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थांची व्याख्या:</u>

"विशिष्ट कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या व समान उद्दिष्ट धारण करणाऱ्या पगारदार वर्गाकडून परस्पर मदत आणि सहकार तत्त्वाधिष्ठित स्थापन केलेली सहकारी संस्था म्हणजे पगारदार नोकरांची पतसंस्था होय."

१:५ ब: <u>पगारदार नोकरांच्या पतसंस्थांची उद्दिष्टे:</u>

अशा प्रकारच्या संस्था अनेक सहकारी, निमसरकारी कार्यालयांमधून व उद्योगधंद्यामधून स्थापन झाल्याचे दिसून येते. त्यांचे प्रमुख उद्देश पुढील प्रमाणे आहेत:

१) सभासदांना त्यांच्या वैयक्तिक जबाबदारीवर अल्प मुदतीचा कर्जपुरवठा करणे.

२) सभासदांत काटकसर, बचत व परस्परांमधील सहकार्य वाढीस लावणे.

३) सभासदांना जीवनावश्यक वस्तू रास्त किमतीने उपलब्ध करुन देणे व त्यासाठी वस्तूंची खरेदी-विक्री करणे.

४) सभासदांना कर्ज दिल्यानंतर शिल्लक असलेल्या पैशाचा काही भाग व्यापारी बँकाकडे ठेवीच्या स्वरुपात किंवा सरकारी कर्ज रोख्यात गुंतविणे.

आपल्या सभासदांचे कल्याण साध्य करण्याच्या हेतूने व त्यांची सावकाराच्या तावडीतून सुटका करण्यासाठी आवश्यक असलेले व्यवहार करणे हे प्रमुख उद्दिष्ट या संस्थांचे असते.

१:६ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थांची गरज:

भारतात सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण भागातच झाला. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया दुर्बल व कमकुवत लोकांना वाजवी दराने पतपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. परंतु शहरातील सामान्य नागरिकांना देखील पतपुरवठ्याची आवश्यकता असते. प्रामुख्याने शहरातील पगारदार, वेतनदार, लहान व्यापारी, कारागीर इत्यादींना पतपुरवठा आवश्यक असतो. त्यासाठी नागरी पतपुरवठा संस्था व नागरी बँका अस्तित्वात आल्या आहेत. १९१५ च्या मॅक्लगेन समितीने म्हटले होते की, "मध्यम वर्गीयांना बँकिंगची व बचतीची सवय लावण्यासाठी या संस्थांचा उपयोग होईल." १९३१ च्या मध्यवर्ती बँकींग चौकशी समितीने मर्यादित देयता असलेल्या या नागरी बँकांची शक्य तेथे स्थापना करण्याची सूचना केलेली आढळते.

शहरी भागातील नोकरी करणा-या लोकांच्या कर्जविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आल्या. तसेच दुसरे कारण म्हणजे नागरी बँका किंवा संयुक्त भांडवली बँका नागरी मध्यम वर्गास कर्जपुरवठा करण्यास तयार नसत. कारण शहरी नोकर वर्गाकडे योग्य तारण असत नाही. त्यामुळे वैयक्तिक हमीवर बँका कर्ज पुरवठा करत नाहीत. परिणामी नागरी नोकरदार व्यक्तींना सावकाराकडून जादा

व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. म्हणून पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आल्या. प्राथमिक, माध्यमिक शाळांतील, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, रेल्वे व पोस्ट खात्यातील कर्मचारी, विविध महामंडळातील कर्मचारी इ. व्यक्तींचा यात समावेश होतो.

१:७ सहकारी पतपुरवठा संस्थाचा विकास:

भारतात बँकांची सुरुवात १८८९ पासून झाली आहे. भारतामध्ये जर्मनी व इटलीच्या धर्तीवर बडोदे (गुजरात) येथे ५ फेब्रुवारी १८८९ रोजी परस्पर सहाय्यक संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे नाव "अन्योन्य सहकारी मंडळी" असे होते. या संस्थेचे शिल्पकार होते श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर. या संस्थेला १९०४ साली कायदेशीर दर्जा प्राप्त झाला. पूर्वीच्या मद्रास राज्यात (तामीळनाडू) कांजिवरम येथे देशातील पहिल्या नागरी पतपुरवठा संस्थेची १९०४ साली नोंदणी झाली.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीशांनी भारतात राजकीय नीतीचा एक भाग म्हणून तात्कालिक स्वरूपाचे कायदे पास केले. पण मूर्त स्वरूपात १९०४ चा सहकारी पतसंस्थांचा कायदा पास केला. या सहकारी कायद्यानेच भारतात सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. नंतर पूर्वीच्या मुंबई प्रांताच्या धारवाड जिल्ह्यातील कांगीनहाळ येथे ८ मे १९०५ रोजी त्या गावच्या पाटलांनी मुंबई प्रांतातील पहिल्या ग्रामीण सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. कालांतराने फलटण, सांगली, इचलकरंजी व कोल्हापूरच्या संस्थानिकांनी श्री. वैकुंठलाल मेहतांना निमंत्रित केले आणि आपापल्या संस्थानामध्ये सहकार माध्यमाद्वारे ग्रामीण विकासाचे उपक्रम राबविण्यास प्रारंभ केला.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात विविध क्षेत्रात सहकारी संस्था कार्यरत

व प्रगतीपथावर आहेत. दरम्यान पगारदार नोकरांचे हितसंबंध जोपासण्यासाठी पतसंस्थांना चालना दिली जात आहे. यासंबंधी पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते:

<u>कोष्टक क्र.१:१</u>

महाराष्ट्रातील पगारदार नोकरांच्या पतसंस्था

| बाब | १९७१ | १९८१ | १९८५ | १९८७ | १९८८* |
|---|---|---|---|---|---|
| संस्था | २,२२० | ४,१८७ | ४,८८८ | ५,२२८ | ५,४[illegible] |
| सभासद | १,५०५ | २,०१४ | २,४८४ | २,३९४ | २,४६० |
| भाग भांडवल | ३,०७५ | १३,९०३ | २१,१९४ | २१,६८४ | २२,५०० |
| स्वनिधी | ३,५९५ | १६,९१७ | २६,४०४ | २६,४८८ | २८,५०० |
| ठेवी | १,७४० | ११,४१४ | २१,३०९ | १२,११९ | १३,४३० |
| देयकर्जे | २३१ | २,५२७ | ७,२६८ | ११,२४५ | १४,५०० |
| खेळते भांडवल | ६,०६३ | ३६,७६४ | ६५,५५९ | ६१,२४१ | ७०,५०० |
| कर्ज वाटप | ४,१७५ | २८,३१८ | ४८,३६१ | ४८,५८६ | ५३,४०० |
| येणे कर्ज | ३,६५३ | २७,८०३ | ५०,०३३ | ४७,८५६ | ५५,००० |
| थकबाकी | ६१ | ३६५ | ६५१ | १,०६३ | १,३०० |
| नफ्यातील संस्था | १,७९१ | ३,४४६ | ४,२६५ | ४,४८० | ४,५०० |
| नफा | २३१ | १,०८७ | १,८४८ | २,०८१ | २,१०० |
| तोटयातील संस्था | २०४ | ४७३ | ४०४ | ४९२ | ५०० |
| तोटा | ३ | २१ | २१ | ९६ | ११० |

टीप: १) रुपये लाखामध्ये

२) सभासद हजारामध्ये

३)* अस्थायी आकडेवारी

संदर्भ: १) डॉ. वसंत जुगळे, नागरी सहकारी बँक – एक दृष्टीकोन, संपादक- आर.पी. कुलकर्णी व श्रीकांत भिडे, "विश्वस्त" प्रकाशन, चेअरमन इचलकरंजी जनता सहकारी बँक, वर्ष १९८८, पृष्ठ क्र.१२३.

२) Cooperative Movement At A Glance, In Maharashtra State 1988, Commission of cooperative & Registrar of Cooperative societies, Maharashtra State Pune.

वरील कोष्टक क्र. १:१ वरून असे दिसून येते की, सन १९७१ साली महाराष्ट्रातील पगारदार नोकरांच्या पतसंस्थांची संख्या २२२० इतकी होती तर १९८८ मध्ये ५,४६५ पर्यंत वाढली म्हणजे ही वाढ १४६.१७ टक्के झाली आहे. याच कालावधीत भागभांडवल व स्वनिधी मोठया प्रमाणात वाढले. यामधील वाढ अनुक्रमे ६३१.७१ टक्के व ६९२.७७ टक्के इतकी झाली आहे. १९७१ ते १९८८ या काळात पतसंस्थांची थकबाकी मात्र १८६७.२१ टक्क्यांनी वाढली आहे. १९७१ साली फक्त ८०.६८ टक्के संस्था नफ्यात होत्या परंतु १९८८ मध्ये यामध्ये फक्त २ टक्क्यानी वाढ होऊन हे प्रमाण ८२.३४ टक्क्यापर्यंत वाढले आहे. याच काळातील पतसंस्थांचा नफा मात्र ८०९.०९ टक्क्यानी वाढला आहे. परंतु तोटयातील संस्थांचे प्रमाण ९ टक्के कायम आहे. परंतु तोटयामध्ये मात्र ३५६६.६७ टक्क्यानी वाढ झाली आहे.

## १:८ कोल्हापूर जिल्हयाचे भोगोलिक स्थान:

कोल्हापूर जिल्हा १५° व १७° उत्तर अक्षांशात आणि ७३° व ७४° पूर्व रेखांशावर आहे. कोल्हापूर जिल्हयाच्या पूर्वेला व दक्षिणेला कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा, पश्चिमेला रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा आणि

उत्तरेला सांगली जिल्हा आहे. कोल्हापूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७६२० चौ.कि.मी. आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या २४,५७,०९५ होती. कोल्हापूर जिल्ह्यात एकूण बारा तालुके आणि ११५३ गावांचा समावेश आहे.

१:९ "कोल्हापूर" हे नाव कसे प्राप्त झाले ?

फार पुरातन काळी कोल्हापूर नजीक पंचगंगा नदीच्या काठी ब्रह्मदेवाचे राज्य होते. ब्रह्मपुरी ही त्यांची राजधानी होती. (सध्या ही ब्रह्मपुरीची टेकडी पंचगंगेच्या पुलाजवळ आहे. या स्थानाचे उत्खनन होते आहे व तेथील नगरीचे बरेच पुरावे हस्तगत झाले आहेत.)

त्यानंतर पद्माक्ष राजाने सध्याच्या मंगळवार पेठेच्या जागी पद्मापूर नगर वसविले. पद्माक्ष राजाला पद्मावती नावाची एक कन्या होती. ती सती उमाचा अवतार होती असे म्हणतात.

त्याकाळी केशी राक्षस फारच उन्मत्त झाला होता. त्याने पद्मापुरावर चढाई केली. केशी राक्षस व पद्माक्ष राजा यांच्यामध्ये घनघोर युध्द झाले. परंतु केशी राक्षसाला शंकराची वरप्राप्ती झाली होती. त्याला देव व मानवाकडून मृत्यु नव्हता. म्हणून पद्मावती बद्रिकाश्रमी तपश्चर्येसाठी निघून गेली.

केशी राक्षसाने पद्मापुराचा विध्वंस केला व पंचगंगेच्या तीरावर आपल्या नावाने केशीपूर वसवून ती आपली राजधानी केली. पुढे केशीपुराचे केसापूर झाले.

गयासूर हा भगवान विष्णूंचा भक्त होता. भगवान विष्णूंच्या आज्ञेला त्याने आपला बंधू कोल्हासूर याला सपरिवार केशी राक्षसावर युध्दासाठी रवाना केले.

कोल्हासुराचा पुत्र करवीर याने केशी राक्षसाचा पराभव करून त्याचा वध केला. भगवान विष्णूंनी काटयाने काटा काढला. असुराकडून असुराला ठार मारले.

कोल्हासुराने आपला पुत्र करवीर याला राज्यावर बसविले. देवांचे एक वर्ष (मानवांची शंभर वर्षे) राज्य करण्याचा देवांच्याकडून वर प्राप्त करून घेतला व तो तपश्चर्येस निघून गेला. करवीराने आपल्या नावाची करवीर नगरी वसविली.

अधिकार व सत्ता मिळताच करवीरादी राक्षस अत्याचारी व उन्मत्त झाले. तेव्हा महालक्ष्मीला अवतार घेणे प्राप्त झाले. महालक्ष्मी हिम-केदारासह ससैन्य चाल करून आली. तिने घनघोर युध्द करून करवीरादी सर्व असुरांचा नायनाट केला. शेवटी कोल्हासुराचा वध केला व करवीर नगरीस "कोल्हापूर" हे नाव दिले. महालक्ष्मी कोल्हापूरात राहिली व हिमकेदार वाडी रत्नागिरी (जोतिबाचा डोंगर) येथे राहिले. सध्या हिमकेदारनाथ जोतिबाच्या नावाने ओळखले जातात.

अशा प्रकारे कोल्हासूर राक्षसाच्या वधाने कोल्हापूर शहरास "कोल्हापूर" हे नाव प्राप्त झाले.[५]

## १:१० कोल्हापूर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील प्रसिध्द व ऐतिहासिक शहर आहे. कोल्हापूर शहर हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण असून ते पंचगंगेच्या काठी वसले आहे. ते एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. शहराच्या पश्चिमेस दहा कि.मी.च्या अंतरावर प्रसिध्द असे जोतिबाचे देवालय व पन्हाळ गड आहे.

कोल्हापूर शहराच्या मध्यभागी प्रसिध्द असे महालक्ष्मीचे देवालय असून ते संपूर्ण भारतातील हिंदूचे पवित्र स्थान म्हणून ओळखले जाते. त्यामुळे शहरास "दक्षिण काशी" म्हणून संबोधले जाते.

राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी १८९४ मध्ये राज्य प्राप्त केले. मागासलेल्या व दरिद्री देशात सहकारी चळवळीस अनन्यसाधारण महत्त्व आहे हे राजर्षी शाहूंनी ओळखले होते. सहकारी चळवळीच्या मार्गाने लहान शेतकरी, कारागीर व उद्योजक यांना लागणारे भांडवल उपलब्ध होऊन शेती व उद्योगाची वाढ होऊ शकते. दलाल, सावकार व महाजन यांच्या कचाट्यातून शेतकरी व कामगार वर्ग मुक्त होतो. त्याशिवाय शेती व उद्योगातून निर्माण होणाऱ्या मालास किफायतशीर भाव मिळून दलालास नफा न मिळता गोर-गरिबांना मिळेल असे त्यांना वाटत होते. ते म्हणतात, "शेतकऱ्यांनी पिढी-जात व जुन्या शेती करण्याच्या पध्दती सोडल्या पाहिजेत व नवीन मार्गाचा अवलंब मोठया प्रमाणात केला पाहिजे. मजूर व कारागीर यांनी नव-नवीन कसब, तंत्रिकज्ञान व विज्ञान शिकण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे. आर्थिक संपन्नता औद्योगिकरणावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येऊन सहकारी कारखाने सहकारी संस्था व सहकारी बाजारपेठांची व्यवस्था राबविली पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरिता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे." असे आश्वासन देऊन त्यांनी आणखी म्हटले आहे की, "मजूरशक्ती, भांडवल व कसब एकत्र आणून मोठया प्रमाणात अर्थनिर्मिती करण्यासाठी लोकांनी एकत्र यावे व सहकारी पतपेठया, ग्राहक संघ व सहकारी कारखाने सुध्दा निर्माण करावेत." त्यामुळे सुधारित साधने, वाढते भांडवल व वाढती उद्योग-यंत्रणा यातून होणारी अर्थनिर्मिती चार-चौघांच्या खिशात केंद्रीत न होता तिचे वाटप जास्तीत जास्त समाजवादी तत्त्वावर होऊ शकेल असे त्यांना वाटत होते. उद्योग,

व्यापार व वित्तीय साधने यातील खाजगी मक्तेदारीचे दोष (ग्राहकांचे व मजुरांचे परावलंबीत्व व त्यांचे शोषण) जाणवल्यामुळेच त्यांनी सहकारी तत्त्वांचा स्वीकार केला ते म्हणतात, "मक्तेदारीने पछाडलेले भांडवलशाही कारखाने व त्यावर मजूर व इतरांनी अवलंबून राहणे न्याय्य नाही. म्हणून अशा प्रकारची अर्थव्यवस्था स्वीकारणे योग्य नाही." याही पुढे जाऊन ते म्हणतात, "सर्वसाधारण माणसांच्या सहकारी संस्था तयार झाल्या तर आर्थिक उन्नती होईल व त्याचा उपयोग सामाजिक व राजकीय हक्क मिळविण्याकरिता होईल."

## १:११ सहकारी चळवळीचे कोल्हापूर संस्थानात बीजारोपण:

१९०४ साली भारतात सहकारविषयक कायदा संमत झाला. छत्रपती शाहूंनी १९१२-१९१३ साली त्या कायद्याच्या आधारेच सहकार विषयक धोरण कोल्हापूर राज्यात व जहागिरीत लागू केले. श्री. भास्करराव जाधव यांच्यावर सहकारी विभागाच्या प्रमुखपदाची जादा जबाबदारी सोपविली. सहकारी सोसायट्या त्यावेळी बाल्यावस्थेत असताना संस्थानाकडून त्यांनी निरनिराळ्या प्रकारची मदत दिली. या कालखंडात कोल्हापूर संस्थानात २४ मे १९१३ रोजी "कोल्हापूर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर" नावाने पहिली नागरी पतसंस्था स्थापन झाली. नंतर तिचे नाव बदलून "कोल्हापूर नागरी सहकारी बँक" असे ठेवण्यात आले. छत्रपती शाहूंनी आपल्या एडवर्ड ॲग्रिकलचरल इन्स्टिट्यूटच्या हुजूर खजिन्यात जमा असलेल्या निधीतून ३.५ हजार रुपये काढून नागरी पतपेठीत ठेव म्हणून गुंतविले.

छत्रपती शाहू महाराजांच्या उत्तेजनात्मक धोरणामुळे १९१२ ते १९२२ या एक एका दशकातच कोल्हापूर रियासतीत सहकारी संस्थांची वाढ जोरात झाली. कृषी व इतर सहकारी संस्थांची संख्या १९२२ मध्ये अनुक्रमे २९ व २२ एवढी

होती. त्याचप्रमाणे लहान व्यापारी, कारागीर व उद्योजक यांना व्यवसाय वाढविण्यासाठी वित्तपुरवठा माफक दराने व्हावा म्हणून त्यांनी शेती-विषयक इतर सहकारी संस्थांमध्ये कर्जपुरवठा करणाऱ्या सोसायटयांवर भर दिला. १९२२ मध्ये अशा एकूण १२ सोसायटया होत्या. त्यापैकी १० सहकारी पतपेढया होत्या.[६]

१:१२ शिवाजी विद्यापीठाचा पुर्वेतिहास:

कोल्हापूर शहराची शैक्षणिक क्षेत्रात विशेष परंपरा आहे. राजर्षी शाहू महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांनी कोल्हापूर शहरात शैक्षणिक विकासासाठी खूप प्रयत्न केले. याचवेळेपासून कोल्हापूरमध्ये विद्यापीठ असावे या कल्पनेस अंकूर फुटले.

कोल्हापूरमध्ये विद्यापीठ असावे ही कल्पना सर्वात प्रथम डॉ.बाळकृष्ण यांनी मांडली. त्यावेळी ते राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्यांनी आपली कल्पना मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जवळ व्यक्त केली. (मा. यशवंतराव चव्हाण त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते) मा. यशवंतराव चव्हाण व श्री. डी.एस्. देसाई उर्फ बाळासाहेब देसाई यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने १९६२ मध्ये विधानसभेत प्रस्ताव मंजूर केला व सप्टेंबर १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठ अस्तित्वात आले. १८ नोव्हेंबर १९६२ साली भारताचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठ स्थापनेनंतर पहिले कुलगुरु म्हणून डॉ. आप्पासाहेब पवार यांची नेमणूक झाली होती आणि प्राचार्य बी.आर. ढेकणे यांची कुलसचिव म्हणून नेमणूक झाली होती.

सन १९६५ च्या सुरुवातीस सागर माळावर पुना-बेंगलोर हमरस्त्यावर पूर्व व पश्चिम बाजूस शासनाकडून १००० एकर जमीन शिवाजी विद्यापीठास

मिळाली आणि तेथे १९६६ पासून येथे मुख्य कार्यालय सुरु झाले.

शिवाजी विद्यापीठास पाच जिल्हयांचे कार्यक्षेत्र मिळाले होते. कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली व रत्नागिरी हे ते जिल्हये होत. परंतु सन १९७४ मध्ये रत्नागिरी जिल्हा मुंबई विद्यापीठास जोडण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले त्यावेळी त्यास ३३ महाविद्यालये व एक संशोधन संस्था संलग्न होती. आणि विद्यार्थी संख्या फक्त १४०० होती. परंतु सन १९९० पर्यंत यामध्ये लक्षणिय वाढ झाली आहे. सध्या एकूण १६८ महाविद्यालये व ७ संशोधन संस्थान आहेत. आणि विद्यार्थीसंख्या १,१५,७४५ पर्यंत वाढली आहे. शिवाजी विद्यापीठात एकूण दहा विद्या-शाखा आहेत आणि विद्यापीठ कर्मचा-यांची संख्या ८१२ आहे. अशी विशाल परंपरा शिवाजी विद्यापीठास लाभली आहे.[७]

१:१३ <u>अध्ययन क्षेत्र: रुपरेषा व संशोधन पध्दत</u>

शिवाजी विद्यापीठातील प्रशासन क्षेत्रातील कर्मचारी आणि अधिकारी यांच्याकडून १२ फेब्रुवारी १९६९ साली "शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था मर्यादित, कोल्हापूर" रजि. नं. के.पी.आर.:बी.एन्.के./१३६. स्थापन झाली. संशोधनाचा एक पैलू या नात्याने आम्ही या पतसंस्थेचे सखोल अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

१:१४ <u>गृहीतके:</u>

आधुनिक युगात प्रामुख्याने पगारदार नोकरांच्या पतपेढीच्या उत्क्रांतीचे व प्रगतीचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने गृहीतके ठरविण्यात आली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१) पगारदार नोकरांच्या पतसंस्थांना भांडवल उभारणीची नितांत गरज आहे.

२) पतसंस्थांमध्ये ठेवी म्हणने गोळा होणाऱ्या पैशाचा महत्तम वापर करणे.

३) सभासदांच्या गरजा भागविण्यासाठी कर्जे पुरविणे आणि सभासदांच्या हितसंबंधाशी निगडीत कार्ये पार पाडणे.

१:१५ उद्दिष्टये:

संशोधनात्मक दृष्टीकोनातून ठरविण्यात आलेली उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत:

१) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेणे.

२) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या भांडवल रचनेचे परीक्षण करणे.

३) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या ठेवी रचनेचे परीक्षण करणे.

४) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर, सहकारी चळवळ जीवनाभिमुख बनविण्यासाठी उपाय-योजना सुचविणे.

५) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या कर्ज पुरवठ्याच्या रचनेचे परीक्षण करणे.

१:१६ संशोधन आराखडा:

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये

सहकारी चळवळीने आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रक्रियेत महत्त्वाची भर घातली आहे. या पार्श्वभूमीवर "शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था मर्यादित, कोल्हापूर" हे अध्ययन क्षेत्र निवडले आहे. सदर पतसंस्थेच्या अध्ययनासाठी पतसंस्थेकडून प्रत्येक वर्षी वार्षिक अहवाल प्रसिध्द केलेत. त्या वार्षिक अहवालांचा - दुय्यम सामग्रीचा तथ्य संकलनासाठी उपयोग केला आहे. तसेच पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी सभासदांशी पतसंस्थेच्या प्रगती व समस्येबाबत मौखिक चर्चा केली आहे आणि अनुषंगाने सौध्दांतिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१:१७ <u>शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था मर्यादित कोल्हापूर:</u>

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेची स्थापना १२ फेब्रुवारी १९६९ साली करणेत आली. यावेळी संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून श्री. जे.डी. जाधव यांची निवड करणेत आली होती.

या संस्थेच्या स्थापनेमागील मुळ उद्दिष्टे पुढील प्रमाणे होती:

अ) <u>उद्दिष्टये:</u>

१) सदस्यांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार होण्यास उत्तेजन देणे.
२) संस्थेच्या व सदस्यांच्या गरजा भागविण्याकरिता उपविधी क्रमांक तीनमध्ये नमूद केलेल्या साधनांनी भांडवल जमविणे.
३) सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता कर्ज पुरवठा करणे.
४) वरील क्र. १ ते ३ यात नमूद केलेल्या उद्देशांचे पूर्ततेसाठी जरूर भासणारी इतर कामे हाती घेणे.

ब) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे संचालक मंडळ:

संस्थेची व्यवस्था व कामकाज पाहणारे सर्वोच्च मंडळ म्हणजे संचालक मंडळ होय. संचालक मंडळ संस्थेची धोरणे ठरविण्याचे काम करते.

आधुनिक काळात नागरी पतपेढी संस्थांच्या व्यवहारांच्या संख्येत बरीच वाढ झाली आहे. सभासदांच्या विकासासाठी पतपुरवठा करण्याची जबाबदारी नागरी पतपेढी संस्थांनी स्विकारल्यामुळे त्यांनी नागरी पतपुरवठा क्षेत्रात महत्त्वाचे स्थान संपादन केले आहे. संस्थेच्या कर्मचा-यांनी व पदाधिका... दिलेल्या सेवा-सवलतींच्याद्वारेच संस्थेची प्रतिमा निर्माण होत असते पतसंस्थेचे कर्मचारी कार्यतत्पर, सेवाभावी व हुशार असावेत अशी पतपेढी संस्थांच्या कार्यामधील तत्परतेची खात्री झाल्यावर ठेवीदार संस्थेकडे साहजिकच आकर्षित होतात. म्हणूनच कार्यक्षम पदाधिकारी व कर्मचा-यांवर नागरी पतसंस्थांची यशस्वीतेची भिस्त असते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी अकरा जणांचे संचालक मंडळ असून तीन मानद पदाधिकारी आहेत.

सुरुवातीस ९ व्यक्तींचे संचालक मंडळ होते. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव पदसिध्द अध्यक्ष व सभापती असत व इतर आठ संचालक मंडळाचे सदस्य होते. या व्यतिरिक्त एक सेक्रेटरी व एक अंतर्गत लेखा परिक्षक असे स्वरुप होते. परंतु सन १९७८-७९ मध्ये मा. कुलसचिवांनी केलेल्या सुचनेनुसार संस्थेच्या समितीपैकी एका व्यक्तीची सभापती म्हणून निवड करण्याचे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे सन १९८१-८२ मध्ये संचालकांच्या संख्येत बदल करणेत आला. संचालकांची संख्या ९ ऐवजी ११ पर्यंत वाढविण्यात आली. त्यापैकी एक जागा मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवण्यात आली. या

या नवीन तरतूदीनुसार एकूण अकरा संचालकांपैकी एक संस्थेचे अध्यक्ष, एक उपाध्यक्ष व आठ संचालक आहेत. याव्यतिरिक्त तीन मानद पदाधिका--यांमध्ये एक संस्थेचा सेक्रेटरी, एक अंतर्गत लेखा परिक्षक व एक कायदे सल्लाकार आहे.

संस्थेमार्फत दर तीन वर्षांनी गुप्त मतदान पध्दतीने निवडणूका घेतल्या जातात व पदाधिकारी निवडले जातात. प्रत्येक सभासदास एक मत देण्याचा अधिकार आहे.

संस्थेच्या मानद पदाधिका-यांना मानधन दिले जाते आणि संचालकांना मिटींग भत्ता दिला जातो.

क) तपासणी वर्ग (ऑडिट क्लास):

प्रत्येक सहकारी संस्थेच्या हिशोबाची, व्यवहारांची तपासणी, सहकारी खात्यामार्फत दरवर्षी केली जाते. हिशोब तपासणीअंती सहकारी संस्थांना तपासणी वर्ग दिला जातो. "अ", "ब", "क" आणि "ड" अशी या तपासणी वर्गाच्या वर्गीकरणाची मुळाक्षरे असून त्यांचा अर्थ पुढील प्रमाणे आहे.

१) "अ" वर्ग : चांगली, उत्तम
२) "ब" वर्ग : बरी, मध्यम प्रतीची
३) "क" वर्ग : सर्वसाधारण, कनिष्ठ प्रतीची
४) "ड" वर्ग : वाईट निकृष्ट

सहकारी निबंधकांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे ही वर्गवारी दिली जाते. वर्गवारी देताना सहकारी संस्थेची जीवनशक्ती, कारभारातील कार्यक्षमता, आर्थिक स्थैर्य, कर्मचारी वर्ग, अंतर्गत नियंत्रण,

थकित कर्जे, व्यवस्थापनातील कौशल्य, हिशोब पुस्तकामधील व्यवस्थितपणा, पूर्वीच्या अहवालाची समाधानकारक दोष दुरुस्ती इ. बाबींचा विचार केला जातो.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेस सन १९६९-७० पासून सन १९८८-८९ या वीस वर्षांच्या कालावधीत प्रत्येक वर्षी मे. सहकार नियुक्त लेखा परिक्षाकांनी संस्थेची हिशोब तपासणी केलेली असून संस्थेची एकूण सांपत्तिक स्थिती, हिशोब, दप्तरी कामकाजातील सुधारणा व प्रगती पाहून "अ" वर्ग कायम ठेवला आहे. ही बाब संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने भूषणावह आहे.

ड) सभासदत्त्व:

प्रस्तावना:

नागरी भागातील सज्ञान, करारपात्र व्यक्ती सहकारी संस्थांची सभासद होऊ शकते. सभासदत्त्वाबाबतची पात्रापात्रता त्या संस्थेच्या नियमावलीत, उपनियमांत किंवा उपविधीत दर्शविलेली असते. सभासदत्वाचे प्रामुख्याने दोन वर्ग असतात.

१) नियमित सभासद - "अ" वर्ग.
२) नाममात्र सभासद - "ब" वर्ग.

काही खास कारणासाठी म्हणजे विशेषत: ठराविक तारणावर कर्ज उपलब्ध करुन देताना, सदर कर्जदाराला नाममात्र सभासद म्हणून नोंदविले जाते. नाममात्र सभासदांना मताचा अधिकार नसून त्यांना पतपेढीच्या नफ्यामध्ये लाभांश मिळण्याचा अधिकार नसतो. याउलट नियमित सभासद हे भागधारक असतात. त्यामुळे त्यांना मताचा व नफ्यामध्ये लाभांश मिळविण्याचा अधिकार असतो.

## ३) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सभासदत्त्व:

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या उपविधी व नियमानुसार फक्त शिवाजी विद्यापीठ सेवेतील कायम कर्मचा-यास पतपेढी संस्थेचे सभासद होता येते. परंतु सन १९८६-८७ साली उपविधीमध्ये बदल करून संस्थेचे भांडवल व ठेवींमध्ये वाढ होण्यासाठी "ब" वर्ग सभासद करून घेण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये सभासदांच्या पती /पत्नी / मुले/मुली, निवृत्त सभासद व शिवाजी विद्यापीठाच्या सेवेत हंगामी/रोजंदारी असलेले सेवक यांचा समावेश होतो. १९८८-८९ साली ही संख्या फक्त सात होती.

पतपेढी संस्थेच्या उपविधी व नियमावलीनुसार खालील अटी पू-या करणा-या कर्मचा-यास संस्थेचे सभासदत्त्व प्राप्त होऊ शकते:

१) तो पूर्ण १८ वर्षे वयाचा व करार करण्यास लायक असला पाहिजे.

२) तो चांगल्या वर्तणुकीचा असला पाहिजे.

३) त्याची पत चांगली असली पाहिजे व त्यांचेकडे सरकारी बाकी बिगर परवानगीने थकलेली नसावी. किंवा त्याचेवर दिवाणी कोर्टाचा हुकुमनामा नसला पाहिजे.

४) संस्थेचे उद्देश त्यास समजले असले पाहिजे.

५) त्याचा सदस्य होण्याबाबतचा लेखी अर्ज समितीतील एकूण सदस्यांच्या निम्म्याहून अधिक बहुमताने मंजूर केला असला पाहिजे.

६) त्याने एक रुपया प्रवेश फी दिली असली पाहिजे.

७) त्याने निदान एक तरी "भाग" (शेअर) घेऊन त्याची पूर्ण रक्कम भरली असली पाहिजे.

८) त्या सेवकाची शिवाजी विद्यापीठात कमीत कमी सहा महिने नोकरी झालेली असावी.

९) अधिनियम, नियम व उपविधी यातील अटी त्याने पू-या केलेल्या असल्या पाहिजे.

१०) तो समान उद्देश असलेल्या इतर संस्थेचा सदस्य नसला पाहिजे.

११) त्याचे वेतन आदा करणा-या अधिका-यास त्याचे वेतनातून संस्थेच्या कर्जाची, वर्गणीची व इतर रक्कम कापून घेण्यास त्याने तेही अधिकार पत्र (परत घेता न येईल असे) लिहून दिले असले पाहिजे.

तसेच संस्थेच्या पूर्णवेळ कायम नोकरास संस्थेचे सभासद होता येईल. मात्र त्यांना संस्थेच्या पदाधिकारी अगर व्यवस्थापन मंडळाच्या कोणत्याही निवडणूकीत भाग घेणेचा अधिकार नाही.

सभासदाने गैरवर्तन केल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास त्यास काढून टाकता येते. साधारण सभेस हजर असणा-या व मताचा अधिकार असणा-या सदस्यांच्या संख्येच्या ३/४ सदस्यांच्या मताने कोणत्याही सदस्यांस खालील पैकी कोणत्याही कारणाकरिता संस्थेतून काढून टाकता येईल.

१) जर तो आपली बाकी सतत थकविणारा असेल अगर सदस्यत्वाच्या अटी पाळीत नसेल.

२) जर समितीच्या मते तो संस्थेच्या हिताविरूद्ध कांही कृत्य करीत असेल अगर संस्था व्यवस्थेशीर चालण्यास अडथळे आणीत असेल.

३) जर समितीच्या मते त्याने संस्थेला बदनाम केले असेल.

४) जर संस्थेशी होणा-या त्याच्या व्यवहारांच्या बाबीसंबंधीच्या उपविधीचे उल्लंघन करीत असेल.

५) जर त्याने भागाचा हप्ता अगर लागोपाठ तीन महिन्यांची वर्गणी थकविली असेल.

६) जर त्याने दिवाळे निघाले असेल अगर तो कायद्याने नालायक ठरला असेल.

७) जर त्याला फौजदारी गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली असेल.

संस्थेतून काढून टाकलेल्या सदस्यास अधिनियम क्र. ३५ व नियम क्रमांक २८ व २९ मधील तरतूदी विचारात घेऊन व त्यातील तरतुदीनुसार त्यास पुन्हा सदस्य करता येण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सभासद संख्येतील वाढ:
===============

पतसंस्थेची सभासद संख्येतील वाढ ही शिवाजी विद्यापीठातील कायम कर्मचारी संख्येतील वाढीवर अवलंबून असते. जसजशी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संख्येत वाढ होत जाईल, तसतशी (त्याच प्रमाणात नव्हे) संस्थेच्या सभासद संख्येत वाढ होत जाते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या सभासद संख्येतील वाढ खालील कोष्टकात दर्शविली आहे.

..

कोष्टक क्र. १:२

सभासद संख्येतील वाढ

| अ.नं. | वर्ष (३० जून) | सभासद | सभासद संख्येतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १ | १९६९-७० | उपलब्ध नाही | -- |
| २ | १९७०-७१ | १९९ | -- |
| ३ | १९७१-७२ | २४७ | २४.१२ |
| ४ | १९७२-७३ | २५७ | ४.०५ |
| ५ | १९७३-७४ | ३०७ | १९.४५ |
| ६ | १९७४-७५ | ३५८ | १६.६१ |
| ७ | १९७५-७६ | ३९२ | ९.४९ |
| ८ | १९७६-७७ | ४०७ | ३.८३ |
| ९ | १९७७-७८ | ४४० | ८.११ |
| १० | १९७८-७९ | ४७७ | ८.४१ |
| ११ | १९७९-८० | ५२३ | ९.६३ |
| १२ | १९८०-८१ | ५५८ | ६.६९ |
| १३ | १९८१-८२ | ५९६ | ६.८१ |
| १४ | १९८२-८३ | ६१६ | ३.३५ |
| १५ | १९८३-८४ | ६३८ | ३.५७ |
| १६ | १९८४-८५ | ६५५ | २.६६ |
| १७ | १९८५-८६ | ७२१ | १०.०७ |
| १८ | १९८६-८७ | ७४४ | ३.१९ |
| १९ | १९८७-८८ | ७३९ | — ०.६७ |
| २० | १९८८-८९ | ७८५ | ६.२२ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७०-७१ ते सन १९८८-८९ पर्यंतच्या वार्षिक अहवालावरून.

संस्थेकडून १९६९-७० ची आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही.

कोष्टक क्र. १:२ वरून असे दिसून येते की, १९७०-७१ साली सभासद संख्या १९९ होती, ती संख्या १९७३-७४ पर्यंत ३०७ एवढी वाढली म्हणजे या कालावधीत ५४.२७ टक्क्यानी वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पुढील पाच वर्षाच्या कालावधीत १९७४-७५ ते १९७८-७९ मध्ये सभासद संख्येतील वाढ ३३.२४ टक्के झाली आहे आणि १९७९-८० ते १९८३-८४ या कालावधीमध्ये सभासद संख्या २१.९९ टक्के वाढली आहे तर १९८४-८५ ते १९८८-८९ मध्ये फक्त ११.८५ टक्क्यांनी सभासद संख्या वाढल्याचे दिसून येते.

यावरून असे दिसून येते की, सभासद संख्येतील वार्षिक टक्केवारीतील वाढ हळू हळू कमी होत गेली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शिवाजी विद्यापीठ सेवेतील कर्मचारी संख्या सुरूवातीस वेगाने वाढत होती.परंतु नंतर कर्मचारी संख्या वाढीचा वेग कमी झाल्याने त्याचा परिणाम संस्थेच्या सभासद संख्या वाढीवर झाला आहे.

१९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षामध्ये सभासद संख्येतील सर्वात जास्त वाढ १९७१-७२ मध्ये झाली आहे. ही वाढ २४.१२ टक्के असल्याचे दिसून येते. सभासद संख्या वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे कर्मचा-यांना कर्जपुरवठा करणारी शिवाजी विद्यापीठातील ही पहिलीच व एकच संस्था असल्याने सभासद संख्या मोठया प्रमाणावर वाढली आहे.

याउलट १९८७-८८ मध्ये सभासद संख्या ०.६७ टक्क्यानी घटली आहे. ही घट होण्याचे मुख्य कारण म्हणजे १९८६-८७ मध्ये सभासद संख्या ७४४ होती त्यामध्ये १९८७-८८ साली ९ सभासदांनी वाढ झाली परंतु राजीनामा, सेवानिवृत्ती, मृत्यु व इतर कारणांनी १४ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्ष अखेरीस फक्त ७३९ सभासद संख्या शिल्लक राहीली परिणामी सभासद संख्येत घट झाल्याचे दिसून येते.

१९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षांच्या कालावधीत एकूण सभासद संख्येतील वार्षिक वाढ २९४.४७ टक्के झाली आहे. मात्र सभासद वार्षिक वाढीचे सरासरी प्रमाण हे ७.६६ टक्के असल्याचे दिसून येते.

यावरुन असे दिसून येते की, संस्थेची सभासद संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु सरासरी वार्षिक सभासद वाढीचे प्रमाण कमी होत आहे. सर्व-साधारण विचार करता सभासद संख्या वाढत असून त्यामुळे संस्थेस ठेवी गोळा करण्यास व संस्थेच्या एकूण व्यवहारात वाढ होण्यास मदत होते आहे.

........

## संदर्भ सूची

१) प्रा.जी.एन्. अलवंडी, सहकार (तत्व व व्यवहार) "राजेंद्र प्रकाशन", सोलापूर, सप्टेंबर १९७६, पान नं. १.

२) प्रा.ए.आर.रायखोलकर व प्रा. अशोक डांगे, सहकार: तत्त्वे आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, ऑक्टोबर १९८९, पान नं. ५ ते ८.

३) प्रा. व्ही.टी. चौगुले व प्रा. के.जी. पठाण, भारतीय सहकारी चळवळ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, वर्ष १९८०, पान नं.२२१ ते २२२.

४) डॉ. गो.स. कामत, सहकार: तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री. विद्या प्रकाशन, पुणे-३०, ऑगस्ट १९७९, पान नं.२३ व २४.

५) श्री.दा.वि. कुलकर्णी, वरदायिनी महालक्ष्मी, समाज शिक्षण माला ३९७, पुणे-३०, ऑक्टोबर १९८३, पान नं. ६,७,८.

६) डॉ. व्हि.बी. घुगे, छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण; दी कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.शाहुपूरी, कोल्हापूर-१, १५ ऑगस्ट १९७५, पान नं.१५० ते १५३.

७) The Development of Shivaji University A Glimpse, Shivaji University Press, Kolhapur. December 1983, Page No. 1,2.